दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २०५ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.४ मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## उद्रेक होऊ देऊ नका, जास्त दिवस सहन करणार नाही:माझ्या आणि रोहितच्या आईवर बोलल्यास करारा जवाब मिलेगा;सुप्रिया सुळेंचा इशारा

**बारामती । प्रतिनिधी**
माझ्या आणि रोहितच्या आईवर दोनवेळा बोलला ठीक आहे, तिसऱ्या वेळी बोलला, तर करारा जवाब मिलेगा असा इशारा राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिला आहे. बारामतीमध्ये महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुप्रिया सुळे यांनी अनेक मुद्द्यांवर भाष्य करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही निशाणा साधला आहे.सुप्रिया सुळे यावेळी बोलतांना म्हणाल्या, ''आमच्या घरातील गोष्टी रोज टीव्हीवर दिसतात, अनेक प्रश्नांची उत्तरे माझ्याकडे आहेत पण देणार नाही. अनेक महिने झालं सहन करत आहे, आता जास्त दिवस सहन करणार नाही, उद्रेक होऊ देऊ नका. माझ्या आणि रोहितच्या आईवर दोनवेळा बोलला ठीक आहे, तिसऱ्या वेळी बोलला, तर करारा जवाब मिलेगा'', असा रोखठोक इशारा सुप्रिया सुळेंनी दिला.याशिवाय सुप्रिया सुळेंनी अजित पवारांवरही निशाणा साधला आहे. ''आमच्या खानदानाचे वाभाडे निघतील ते मी होऊ देणार नाही. नाती सांभाळायला शक्ती लागते तोडायला लागत नाही. प्रेमाने मागितले असते तर हसत हसत सर्व काही दिले असते. या जागेवर नेहमी आपली सांगता सभा होत असते. मात्र यावेळी सांगता सभेसाठी दुसऱ्यांनी बुकिंग केले आहे.त्या पुढे म्हणाल्या की, ''विरोधी पक्षात आल्यापासून जास्त टाळ्या आता मिळतात. माझा बाप थकला नाही श्रमलेला आहे. शरद पवार कृषी मंत्री असते तर कांदा, दूध दर मिळाला असता. शेतकरी कर्जमाफी झाली असती. २०१४ मध्ये आमची आई म्हणायची तुमचे सरकार येत नाही आणि खरंच सरकार नाही आले. आमच्या आईची आता कटकट वाढली आहे. आता ती म्हणते आता सरकार जाईल'', असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.दरम्यान, याच मेळाव्यात शरद पवारांचा ओरिजिनल डीएनए हा सुप्रियाताईंमध्येच आहे असे विधान सुनेत्रा पवारांच्या सख्ख्या जाऊबाई शर्मिला पवार यांनी केले आहे. मी पवारांची सून आहे, याचा मला अभिमान आहे. परंतु माझ्या नणंदेची जागा मी नाही घेणार असेही त्या म्हणाल्या. या विधानाचीही सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.



## कलाविष्कारच्या वर्धापन दिनानिमित्त भिजकी वही

**पुलगाव । प्रतिनिधी**
स्थानिय कलाविष्कार मंडळ,च्या वर्धापन दिनानिमित्त भिजकी वही हा कवितांचा नाट्यानुभव प्रयोग आयोजित करण्यात आला आहे. परिवर्तन या जळगावच्या संस्थेचा हा सर्वांगसुंदर प्रयोग आहे.अरुण कोल्हटकर हे मराठीतील मोठे कवी आहे.त्यांची कविता अवघड आहे , कळत नाही असा सार्वत्रिक गैरसमज दूर करणारा हा कार्यक्रम केवळ कवितावाचन नाही तर सुंदर असा नाट्यानुभव आहे. कवितेची अनुभूती आहे. वेगवेगळ्या स्त्रियांचा हुंकार आहे.वेदनेची दाहकता... मानवी संस्कृतीमधील स्त्रियांच स्थान... या आणि अश्या अनेक विषयांना स्पर्श करत ...रसिकांच्या मनाला स्पर्श करणारा अनुभव म्हणजे ...भिजकी वही. कार्यक्रम सर्वांसाठी खुलाअसुन निशुल्क आहे. पुलगावकरांनी दि. ५ मे २०२४, रविवारी, सायं. ७.३० वा. कलाविष्कार स्तंभ परिसर, गांधीनगर,पुलगाव येथे आयोजित कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन कलाविष्कार मंडळाचे अध्यक्ष दिलिप घालणी यांनी केले आहे.

## सी.ए.डी च्या अग्निशमन योद्धांचा सन्मान



**पुलगाव । प्रतिनिधी**
१ मे २०२४ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त सीएडी पुलगाव येथील अग्निशमन दलाच्या जवानांना जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्याच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.
वर्षभरात वर्धा जिल्ह्यात विविध ठिकाणी आगीच्या घटनांवर नियंत्रण मिळविण्यात सीएडी अग्निशमन विभागाच्या जवानांना यश आले. या जोखमीच्या कामासाठी अग्निशमन दलाच्या जवानांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक नुरुल हुसेन, जिल्हा परिषद सीओ रोहन घुगे, सीसीएमई मेजर डागर उपस्थित होते.या विशेष कामगिरीबद्दल सीएडी कमांडेंट ब्रिगेडियर कौशलेश पंघाळ यांनी सर्व अग्निशमन जवानांचे अभिनंदन केले व जिल्हाधिकारी प्रशासनाचे आभार मानले.

## मतदार जनजागृतीसाठी रेल्वे स्थानकावर दि. ६ ते ८ चित्रप्रदर्शन


**छत्रपती संभाजीनगर**–केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाअंतर्गत केंद्रीय संचार ब्युरो यांच्या वतीने सोमवार दि.६ पासून छत्रपतीसंभजीनगर रेल्वेस्थानक येथे मतदार जनजागृतीसाठी चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि.६ रोजी सकाळी ११ वाजता या प्रदर्शनास सुरुवात होणार आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. बुधवार दि.८ पर्यंत हे प्रदर्शन नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध राहणार आहे,असे क्षेत्रीय प्रचार अधिकारी प्रदीप पवार यांनी कळविले आहे.


## नेरी येथे ग्राम जयंती उत्सव संपन्न

**चिमूर ।प्रतिनिधी**
चिमूर तालुक्यातील नेरी येथे मानवतेचे महान पुजारी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्मदिवस ग्राम जयंती च्या स्वरूपाने हा उत्सव श्री गुरुदेव सेवा मंडळ नेरीच्या वतीने दिनांक २४ एप्रिल ते ३० एप्रिल या सात दिवसीय ग्राम जयंती उत्सव साजरा करण्यात आला. यात प्रामुख्याने प्रत्येक सहा वार्डमध्ये सामुदायिक प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले.
पिसे मोहल्ला हनुमान मंदिर नेरी, बुरड मोहल्ला मंदिर ,शंकरजी देवस्थान मंदिर, गजानन मंदिर फडणवीस लेआउट, जगन्नाथ मंदिर, पंढरीनाथ देवस्थान मंदिर, या संपूर्ण गावातील मंदिरामध्ये रोज सायंकाळी ६:४० मिनिटांनी सामुदायिक प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रार्थनेच्या महत्त्वावर ग्राम जयंतीच्या निमित्ताने प्रचाराकांचे मार्गदर्शन सुद्धा ठेवण्यात आले. आणि या सर्व कार्यक्रमाची सांगता ३० एप्रिल रोज मंगळवार ला सकाळी ५:०० वाजता सामुदायिक ध्यान ध्यानानंतर ग्रामसफाई करण्यात आली. त्यानंतर गावामधून वंदनीय राष्ट्र तुकडोजी महाराजांची पालखी गावातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करीत रामधून राम नामाचा गजरात काढण्यात आली. या सर्व मार्गावर संताचे फोटो लावून पालखीचे स्वागत करण्यात आले .या कार्यक्रमाचा समारोप दुपारी ठीक २ वाजता ह.भ. प. कापसे महाराज यांचे ग्राम जयंतीच्या महत्वावर प्रवचन आणि मार्गदर्शनाच्या माध्यमातून करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी ६:४० ला सामुदायिक प्रार्थना आणि राष्ट्रवंदांना आणि महाप्रसादा ने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वी तेसाठी श्री गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष दादाराव पिसे , देवराव कडूकार उपाध्यक्ष, श्याम हटवादे, कमलाकर लोणकर, दिवाकर पिसे व्यवस्थापक, अशोक पंधरे सचिव, माया पिसे, विठाबाई भरडे , राम राऊत ग्रामगीताचार्य, घनश्याम चापले तालुका प्रचार प्रमुख, विलास पिसे, प्रमोद पिसे , रवि चुटे, रमेश पिसे , दामू पिसे, डॉ जगदीश पिसे, आणि संपूर्ण कार्यकारी मंडळ आणि सर्व गुरुदेव सेवा मंडळातील उपासक, उपासिका, बालगोपाल मंडळी आणि गावातील सर्व भाविक नागरिकांनी अतिशय मोलाचे सहकार्य या कार्यक्रमासाठी केले. या सर्व कार्यक्रमाच्या यशस्वी साठी सर्व पदाधिकारी वार्डातील लोकांनी मोलाचे सहकार्य करत हा कार्यक्रम अतिशय हर्ष उल्हासात संपन्न केला.



## सुनिल कावळे यांनी गुजेवाही गावात जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक विवाहाचा वाजवला डंका





**मूल । प्रतिनिधी**
समाजातील अधश्रध्दा पारंपारिक रुढी परंपरेला नाकारून महात्मा फुले यांच्या सत्यधर्मावर विश्र्वास ठेवून आपल्या कोमल नावाच्या मुलीचा विवाह सत्यशोधक पद्धतीने केला चद्रपुर जिल्ह्यातील वनाने व तलावाने वेढलेल्या गावात महात्मा फुले व सावित्रीआई फुले विचारांचा प्रभाव जोर पकडला आहे.
सिंदेवाही तालुक्यातील गुजेवाही येथील शेतमजुर अशिक्षित होतकरु आशा व काशीनाथ चौधरी यांची सुकन्या कोमल हिचा विवाह मुल तालुक्यातील भेजगाव येथील अनुसया व गणपत मोहुर्ले यांचे सुपुत्र राहुल यांचेशी दि १मे रोज बुधवारला गुजेवाही येथे वधूचे मंडपी सत्यशोधक पद्धतीने सपन्न झाला. समाजातील अधश्रध्दा जुन्या पारंपारिक चाली रिती अशा विचारांना नाकारुन क्रातीसुर्य महात्मा फुले व क्रातीजोती सावित्रीआई फुले विचार स्विकारुन कोमल व राहुल यांनी गुजेवाही येथील काशीनाथ चौधरी यांचे घरी आपला विवाह सत्यशोधक पद्धतीने लावला यांच्या विवाहाचे समाजात गावात व परिसरात कौतुक होत आहे.सत्यशोधक विधीकर्ते सुनिल कावळे यांनी प्रथम वधुवराना दिप प्रवज्लन करण्यास सांगीतले,महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन करुन वधवराच्या आईवडीलाचा सर्वात करण्यात आले,जोतीसावित्री वंदना घेवून ,वधूवराना प्रतिज्ञा देण्यात आली,प्रतिज्ञामध्ये व्यसन व्यभीचार करणार नाही,खोटं बोलणार नाही अशी प्रतीज्ञा देण्यात आली, क वधूवरांना उभे करुन त्याच्या हातात हात देवून महात्मा फुले रचीत मंगलाष्टक म्हणण्यात आले. मंगलाष्टक झाल्यानंतर वधूवराकडुन शपथ वदवण्यात आली नवदाम्पत्याला सन्मानपत्र व सुनिल कावळे लिखित क्रातीकारक मायबाप ग्रथ व सत्यशोधक विधी पुस्तक देवून सन्मान करण्यात आला . सत्यशोधक विधीकर्ते सुनिल कावळे याची आर्थीक परिस्थिती हलाखीची असुन फुले दाम्पत्याचे विचार त्याच्या नसानसात आहे असा सत्यशोधक विधीकर्ता चद्रपुर गडचिरोली जिल्ह्यात निर्माण होईल का.असा प्रश्न सत्यशोधक विवाहाप्रसगी गुजेवाही येथील येथील माळी समाज पदाधिकाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सत्यशोधक विवाह सोहळयाला गुजेवाही येथील माळी समाजाचे अध्यक्ष सुभाष शेंडे,कोषाध्यक्ष हरीचद्र गुरनुले,गुरु शेंडे कलावंत आघाडी,किरण बोरुले सामाजीक कार्यकर्ते,भगवान दुर्गे वन समीती सचिव गुजेवाही,चंद्रकांत मोहुर्ले ग्रा प सदस्य गुजेवाही,व आप्त नातेवाईक व गावकरी पाहुणे मडळी उपस्थित होते या विवाहाची चर्चा गावात व परीसरात होत आहे.

## सावरगाव येथील लोक विद्यालयात महाराष्ट्र दिन

**तळोधी( बा) । प्रतिनिधी**
द रूरल एज्यूकेशन सोसायटी ब्रम्हपुरी द्वारा संचालित नागभीड तालुक्यातील सावरगाव येथील लोक विद्यालय शाळेत महाराष्ट्र दिन अत्यंत आंनदाने व उत्साहाने साजरा करण्यात आला.यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम कामडी यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला.यावेळी विद्यालयातील शिक्षक,नरेंद्र घोडमारे,राजू आमले, पदमाकर निखारे,उद्धव देशमुख,शैलेश खंडाळे,उत्तम बोरकर,सहायक शिक्षिका संगीता ढोके,श्री बदखल,श्रीकांत बोरकर,गीता,सुधीर शिवणकर इतर कर्मचारी शिक्षकोत्तर कर्मचारी,विद्यार्थी,विद्यार्थिनींची उपस्थिती होती.



## शिवसेना फोडल्याने बाळासाहेबांचा शाप लागणार:मोदी सत्तेतून पाय उतार होणार–वडेट्टीवार

**मुंबई–बाळासाहेबांचा शाप मोदींना लागला आहे. ते सत्तेतून पाय उतार होणार अशी टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. शिवसेना फोडल्यानंतर बाळासाहेब ठाकरेंना किती वेदना झाल्या असतील? असा खोचक सवालही त्यांनी केला आहे. पंतप्रधान मोदी यांच्या बाळासाहबांवरील विधानावरून वडेट्टीवारांनी निशाणा साधला आहे. लातूरमध्ये त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला आहे.यावेळी बोलतांना वडेट्टीवार म्हणाले, ''पंतप्रधान नरेंद्र मोदींना आता पराजय दिसत आहे, त्यामुळे उद्या आपण सत्तेतून गेलो तर कोणीतरी आपणाला सांभाळणारे असले पाहिजे अशा विचाराने ते आता उद्धव ठाकरेंबद्दल जवळीकतेची भाषा करीत आहेत. शिवसेना फोडल्यानंतर बाळासाहेब ठाकरेंना किती वेदना झाल्या असतील? आणि म्हणूनच बाळासाहेबांचा शाप मोदीजींना लागला आहे. त्यामुळेच मोदी सत्तेतून पाय उतार होणार आहेत. शिवाय बाळासाहेबांचे सुपुत्र सोडून दुसऱ्याला मुख्यमंत्री करणे ही कुठली नैतिकता आहे?'', असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.**

## मूल येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्राम जयंती उत्सव संपन्न


**मूल । प्रतिनिधी**
ग्रामोत्थानाच्या दृष्टीने ग्राम विकासाची सुत्रबध्द,आदर्श संकल्पना ग्रामगीता या चिंतनशील ग्रंथातुन ४१ विषयांवर लेखन करुन समाजाला परिवर्तनाची योग्य दिशा देणारे मानवतेचे महान पुजारी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्मदिवस ग्रामजयंती उत्सव अ.भा.श्री गुरुदेव सेवा मंडळ तालुका मुल,पतंजली योग समिती आणि श्री गुरुदेव बचत गट मूल च्या वतीने योग भवन प्रार्थना मंदिर मुल येथे दिनांक ३० एप्रिल २०२४ रोज मंगळवारला साजरा करण्यात आला.
सायंकाळी ६.३० वाजता सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली आणि सामुदायिक प्रार्थना विषयी ग्रामगीताचार्य नामदेव पिजदुरकर यांनी मार्गदर्शन केले याप्रसंगी पतंजली योग
समिती मुल चे अध्यक्ष प्रभाकर भोयर, ग्रामगीताचार्य सुखदेव चौथाले, प्रा. वसंतराव ताजने, प्रा. किसनराव वासाडे, अनिल गांगरेड्डीवार, गुरूदेव बोदलकर, चंद्रशेखर पिदुरकर सितकुराजी देशमुख, डॉ. हरिहर बेलसरे, गामगीताचार्य विजय लाडेकर, भगवान मंडलवार, अंबादास राजनकर, मुक्तेश्वर खोब्रागडे, विजेंद्र वरगंटीवार, मोतीराम वाघमारे, कोंडावार, मोरेश्वरजी, रवि कोटलवार, निलेश माथनकर, बुरांडेजी, राजु चल्लावार, किशोर भडके, सुचिता बुक्कावार, अल्का कामडी, अरुणा गांगरेड्डीवार, वरगंटीवार, अनुश्री ठिकरे, राजश्री मोहबंशी, भांडारकर, कावळे, लिला वाळके, रामटेके आदींसह सर्व श्री गुरुदेव उपासकमंडळींची उपस्थिती होती. रामधुन प्रार्थना स्थळी आल्यानंतर ग्राम अध्याय वाचन, दुपारच्या सत्रात गुरुदेव सेवा मंडळ शाखा सिं येथील मंडळी गणपत चल आनंदराव भांडेकर, बालाजी बु प्रकाश वासेकर, संतोष चलाख, वासेकर, छत्रपती भुरसे, बंडु चा विनोद घोंगडे, भोजराज चल,दिलीप कोतकोंडावार यांनी भजन दिली.मूल येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्राम जयंती उत्सव संपन्न
पहाटे ४ वाजता मुल येथील गांधी चौक परिसरात स्वच्छता करून,सकाळी ५ वाजता सामुदायिक ध्यानपाठ आयोजन करण्यात आले, ग्रामगीताचार्य गणेश मांडवकर यांनी सामुदायिक ध्यानावर चिंतन प्रस्तुत केले त्यानंतर योग भवन ते गांधी चौक या मुख्य मार्गाने वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या पालखीसह रामधून काढण्यात आली. रामधुन मिरवणूक मुल येथील चौकात पोहचल्यावर श्री गुरुदेव सेवा मंडळाचे जेष्ठ उपासक गिरमाजी भोयर यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ग्रामगीताचार्य शरद सहारे यांनी रामधुन आणि ग्रामजयंती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.



# जागतिक अग्निशामक दिनाचे प्रतीक!

**अग्निशामक समुदाय आणि पर्यावरण सुरक्षित ठेवण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करतात. आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिन दरवर्षी ४ मे रोजी जगभरात साजरा केला जातो. याची सुरुवात १९९९ साली झाली. तेव्हापासून हा दिवस अग्निशमन दलाच्या जवानांच्या बलिदानाचे प्रतीक आणि सन्मान करण्यासाठी सातत्याने साजरा केला जात आहे. श्रीकृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींची ही ज्ञानवर्धक रोचक संकलित माहिती... संपादक.**

कोणताही दिवस साजरा करण्यामागे एक इतिहास दडलेला असतो. त्याच ऐतिहासिक दिवसाची आठवण व्हावी आणि देश संरक्षणाविषयी सैन्याने केलेल्या कामाची सर्वसामान्यांना जाणीव असावी, म्हणूनच ऐतिहासिक महत्व असलेले दिवस साजरे करतात. त्याच अनुशंगाने आज देशभर राष्ट्रीय अग्नीसेवा दिवस साजरा केला जात आहे. जरी आंतरराष्ट्रीय अग्नीशमन दिन हा दरवर्षी ४ मे रोजी साजरा होत असला तरी देशाच्या दृष्टीकोनातून १४ एप्रिलच्या एका घटनेमुळे देशात हा दिन विशेष करून साजरा होतो. आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिन ४ मे रोजी पाळला जातो, आंतरराष्ट्रीय स्तरावर अग्निशमन दलाच्या सेवेसाठी, त्यांचा सन्मान करण्यासाठी, सेवेदरम्यान प्राण गमावलेल्या आणि ११ सप्टेंबरच्या हल्ल्यात शहीद झालेल्या अग्निशमन जवानांच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. दि.२ डिसेंबर १९९८ रोजी ऑस्ट्रेलियातील बुशफायरशी लढताना पाच अग्निशामकांच्या मृत्यूनंतर ४ जानेवारी १९९९ रोजी ऑस्ट्रेलियन अग्निशामक, जेजे एडमंडसन यांनी प्रस्तावित केलेल्या प्रस्तावानंतर त्याची स्थापना करण्यात आली. दि.२ डिसेंबर १९९८ रोजी गिलॉन्ग वेस्ट फायर ब्रिगेडच्या अग्निशामकांनी लिंटन, व्हिक्टोरिया, ऑस्ट्रेलिया येथील जंगलातील आगीशी लढणाऱ्या इतर अग्निशमन दलाच्या मदतीसाठी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद दिला. समोर थंडीमुळे वाऱ्याची दिशा अचानक बदलल्याने पाण्याची टाकी रिफिलिंग करण्यासाठी जात असताना अग्निशमन ट्रकला आग लागली. परिणामी पाच जिलॉन्ग वेस्ट अग्निशामक मारले गेले: गॅरी



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

व्रेडेवेल्ट, क्रिस्टोफर इव्हान्स, स्टुअर्ट डेव्हिडसन, जेसन थॉमस आणि मॅथ्यू आर्मस्ट्राँग ते हे होते. या घटनेमुळे अखेरीस आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाचा प्रस्ताव आला.

अग्निशामक हे लोक आहेत ज्यांचे काम आग विझवणे आणि जीव वाचवणे आहे. आग विझवण्याव्यतिरिक्तच अग्निशामक वाहन अपघात, कोसळलेल्या इमारती, धोकादायक वातावरण आणि इतर अनेक प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितींपासून लोकांना आणि प्राण्यांना वाचवतात. अग्निशामक जीव वाचवतात आणि म्हणूनच हा एक अत्यंत कुशल व्यवसाय मानला जातो जो समाजासाठी खूप मोठे योगदान देतो. अग्निशमन दलाच्या व्यवसायाचे आभार मानण्याच्या उद्देशाने वर्षातून एकदा आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिन साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाचा मुख्य उद्देश अग्निशमन दलाच्या जवानांचा सन्मान करणे आणि त्यांचे आभार मानणे हा आहे, ज्यांनी लोकांचे आणि वन्यजीवांचे जीवन आगीपासून वाचवण्यासाठी आपले जीवन पणाला लावले. या धाडसी कामात अनेक अग्निशमन जवानांचा मृत्यूही होतो. हा दिवस पहिल्यांदा सन १९९९मध्ये साजरा करण्यात आला. खरंतर दि.२ डिसेंबर १९९८ रोजी एका दुःखद घटनेने लिंटन समुदाय, ऑस्ट्रेलिया आणि जगाला हादरवून सोडले. ऑस्ट्रेलियातील व्हिक्टोरियामधील मेलबर्न शहराच्या पश्चिमेला सुमारे १५० किमी अंतरावर असलेल्या लिंटनमध्ये अग्निशामक दल मोठ्या जंगलातील आग विझवण्यासाठी गेले. या संघातील पाच सदस्य गॅरी, ख्रिस इव्हान्स, स्टुअर्ट डेव्हिडसन, जेसन थॉमस आणि मॅथ्यू आर्मस्ट्राँग हे विरुद्ध दिशेने वाहत असलेल्या आगीत होरपळून मृत्युमुखी पडले. त्यांच्या सन्मानार्थ, आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिन दरवर्षी साजरा केला जातो.

आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनासाठी निवडलेली तारीख सेंट फ्लोरियन– सर्व अग्निशामकांचे संरक्षक संत याशी जोडलेली होती. सेंट फ्लोरियन हे रोमन साम्राज्यातील अग्निशमन दलाचे पहिले ज्ञात कमांडर होते. सेंट फ्लोरियन, कॅथोलिक चर्चमध्ये अग्निशामकांचे संरक्षक संत मानले जाते, हे आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाचे आणखी एक प्रतीक आहे. सेंट फ्लोरियनचा संत दिवस– कॅथोलिक चर्चमध्ये पाळल्याप्रमाणे ४ मे आहे, म्हणून आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिन देखील ४ मे रोजी साजरा केला जातो. हा दिवस स्मारक किंवा निधी उभारणी यांसारखे कार्यक्रम आयोजित करण्याचा दिवस म्हणून पाहिला जातो. या दिवशी जगभरातील अग्निशामक आज सामायिक केलेल्या मानवतावादी विचारांचे रक्षण करताना त्यांनी तसेच त्यांच्या सहकार्यांनी प्राण गमावले. भारतात १४ एप्रिल रोजी फायर फायटर सर्व्हिस डे साजरा केला जातो. इतिहासातील याच दिवशी १९४४मध्ये ब्रिटिश मालवाहू एसएस फोर्ट स्टेचकिनला आग लागली आणि ६६ सैनिक ठार झाले. त्यांच्या सन्मानार्थ, दरवर्षी १४ एप्रिल रोजी देशात फायर फायटर सर्व्हिस डे साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाचे प्रतीक दोन रंगांची रिबन आहे, ज्यात लाल रंग फायर आणि निळा रंग पाणी दर्शवितो. लाल आणि निळा रिबन हे आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनासाठी वापरले जाणारे प्रतीक आहे, रिबन ५ सेमी (२ इंच) लांब आणि १ सेमी (०.३९ इंच) रुंद आहे, ज्याच्या शीर्षस्थानी दोन वेगळे रंग जोडलेले आहेत. रिबनचा लाल रंग अग्नीचे प्रतिनिधित्व करतो तर निळा पाण्याचे प्रतिनिधित्व करतो. रिबन पारंपारिकपणे लॅपलवर परिधान केले जाते, परंतु ते लॅपलपुरते मर्यादित नाही. आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाचा एक भाग म्हणून मे महिन्याच्या पहिल्या रविवारी स्थानिक वेळेनुसार दुपारी आवाज बंद होतो. यात ३० सेकंदांसाठी फायर सायरन चालू करणे आणि त्यानंतर कर्तव्यात शहीद झालेल्या सर्व अग्निशमन जवानांच्या स्मरणार्थ एक मिनिटासाठी मौन पाळणे समाविष्ट आहे. आवाज बंद २००२ मध्ये सुरू झाला आणि तो दरवर्षी चालू ठेवला जातो. आग प्रतिबंधक आणि अधिक सखोल आणि सखोल प्रशिक्षणाची गरज म्हणून आंतरराष्ट्रीय अग्निशामक दिनाद्वारे प्रोत्साहन दिले जाते. या दिवसाला कौशल्य आणि जागरूकता दोन्ही वाढवण्याची एक महत्त्वाची संधी म्हणून त्याकडे पाहिले जाते.

!! जागतिक अग्निशामक दिनाच्या सर्वांना प्रेरक हार्दिक शुभेच्छा !!

## आष्टी येथे राज्यस्तरीय डॉजबॉल क्रिडा स्पर्धेचे दि.३,४,५ या रोजी आयोजन...३० जिल्ह्यातील पुरुष व महिला संघांचा सहभाग

**आष्टी | प्रतिनिधी**

बीड जिल्हा डॉजबॉल असोसिएशनचे वतीने आष्टी येथील भगवान महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर दि.३,४,आणि ५ मे २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद डॉजबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेमध्ये राज्यातील ३०जिल्ह्यातील पुरुष संघ आणि २१ जिल्ह्यातील महिला संघ सहभागी होणार आहेत दि.३ मे रोजी सायं.६.०० वाजता या या स्पर्धेचा शुभारंभ आ.सुरेश धस, आ.बाळासाहेब आजबे आणि शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, शिक्षण महर्षी, माजी आमदार भीमराव धोंडे अमोल जैन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष योगेश भंडारी आणि सचिव हेमंत पोखरणा आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष इंजि.किशोर हंबर्डे आणि महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त डॉ.हनुमंत लुंगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार आहे अशी माहिती बीड जिल्हा डॉजबॉल असोसिएशनचे अध्यक्ष ड. बाबुराव अनारसे आणि सचिव प्रा.डॉ.सुनील पंढरे यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे दिली आहे.. याविषयीची अधिक माहिती अशी की,महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशन संलग्नित असलेल्या बीड जिल्हा डॉजबॉल असोसिएशन यांच्या विद्यमाने या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेसाठी वरिष्ठ स्तर पुरुष आणि महिला संघ सहभागी होणार आहेत त्यामध्ये.. जळगाव,पालघर,अकोला, ठाणे,नांदेड,नाशिक,बुलढाणा, कोल्हापूर,सातारा,अमरावती, जालना,छ.संभाजी नगर, सोलापूर,नागपूर,नंदुरबार, यवतमाळ, वाशिम ,पुणे ,सांगली, बीड, सिंधुदूर्ग,गोंदिया,धुळे, गडचिरोली, चंद्रपूर,रायगड, रत्नागिरी, लातूर,अहिल्यानगर, परभणी आणि मुंबई शहर येथील पुरुष संघ सहभागी होणार असून..जळगाव, अकोला, पालघर,ठाणे, नांदेड, नाशिक,बुलढाणा, कोल्हापूर, सातारा,अमरावती, जालना,छ.संभाजीनगर, सोलापूर,वाशिम,पुणे,सांगली, बीड,गडचिरोली,लातूर, परभणी,आणि मुंबई शहर या २१ जिल्ह्याचे महिला संघ सहभागी होणार आहेत स्पर्धेचा शुभारंभ दि.३ मे रोजी सायं.६.०० वाजता होणार असून स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ दि.५ मे रोजी सायं.६.०० वा.भगवान महाविद्यालय आष्टी येथेच होणार आहे या स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या पुरुष संघांची निवास व्यवस्था भगवान महाविद्यालय परिसरातील वस्तीगृह येथे करण्यात आली असून महिला संघाची व्यवस्था ड.बी.डी. हंबर्डे महाविद्यालय परिसरातील वस्तीगृह येथे करण्यात आली आहे या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी संघटक सदस्य बंडू मुरकुटे, आशिष जगताप,आशिष महाद्वार,तुषार पानपट,भारत पानपट,शेख इरफान,उत्कर्ष औंधकर,आदेश काळे,इफत शेख,विशाल खवळे हे परिश्रम घेत आहेत आष्टी तालुक्यातील डॉजबॉल या खेळामध्ये अनेक खेळाडूंनी प्राविण्य मिळवलेले असून अनेक राष्ट्रीय आणि स्तरावरील खेळाडू आहेत आष्टी परिसरातील क्रीडा रसिकांना राज्यस्तरीय महिला व पुरुष संघांच्या दर्जेदार खेळाचे प्रदर्शन या निमित्ताने होणार आहे त्यामुळे परिसरातील क्रीडाप्रेमींनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## आयान पठाण या चिमुकल्याने खाऊ साठी गोळा केलेले पैसे दिले बाप्पांना

**आष्टी | प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार श्री बजरंग बप्पा सोनवणे आष्टी तालुक्यातील गावोगावी प्रचारार्थ मतदारांच्या गाठी भेटी घेतांना तागडखेल येथील आयान शौकत पठाण या १३ वर्षाच्या मुलाने खाऊ साठी गोळा झालेल्या पैशातून सायकल घ्यायची होती परंतु बजरंग बप्पा सोनवणे यांनी निवडणूक यावं यासाठी आपल्या जवळील गोळा केलेले पैसे प्रत्येक्ष बप्पा यांना देऊन टाकले.व तुम्हीच खासदार होणार आहे अशी इच्छा व्यक्त केली.या कल्पनेमुळे बप्पा प्रती असलेला जिव्हाळा सातवीत शिकणारा आयान पठाण कडून दिसून आल्याने आयान चे गावभर कौतुक होत आहे.यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर,आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे अध्यक्ष रामभाऊ खाडे,सुनील नाथ,अमोल राजे तरटे, अल्पसंख्याक संघटनेचे अध्यक्ष शौकत अन्वर पठाण,बाळू गव्हाणे,शरद गव्हाणे,समीर पठाण,संतोष गव्हाणे,दिनकर



जाधव,राजू अकोलकर,आदी मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अज्ञात वाहनाने धडक दिल्याने एकाचा मृत्यू

### सेनगाव येथील जिंतूर सेनगाव हिंगोली टी पॉइंट वरील घटना

**सेनगाव | प्रतिनिधी**

सेनगाव शहरातील जिंतूर सेनगाव हिंगोली टी पॉइंट येथेअज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू झाला असून घटनास्थळी सेनगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे बीट जमादार सुभाष चव्हाण यांनी धाव घेतली सदरील व्यक्तीचा रात्रीच्या सुमारास सेनगाव हिंगोली जिंतूर टी पॉईंट जवळ अज्ञात वाहनाने धडक देऊन वाहन चालक वाहन घेऊन पसार झाला असून सदरील तपास सेनगाव पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात येत आहे मृत्यू व्यक्ती ओळख पटवून सेनगाव तालुक्यातील सापडगाव येथील रहिवाशी असल्याचे पोलिसांना समजले मयत व्यक्तीचे नाव अमोल कांबळे असून त्यांना तात्काळ सेनगाव येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये



नेण्यात आले त्यांच्या अंगावर ठिकठिकाणी जखम झाल्याचे दिसून आल्याने हा अपघात असल्याचं समजलं जाते, पुढील तपास सेनगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार सुभाष चव्हाण हे करीत आहे,

## दहावीच्या परीक्षेत धर्माबादचा प्रा.पी.डी गोणारकर यांची भाची संजीवनी ९० टक्के मार्क घेऊन उत्तीर्ण!

**धर्माबाद | प्रतिनिधी**

तेलंगाना राज्याचा दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला असून त्या परीक्षेत बासर येथील रहिवाशी संजीवनी सायलू कुंटेलू हिने तब्बल ९०% टक्के मार्क घेतले आहे
संजीवनी सायलू कुंटेलू ही बाबुराव गोनारकर यांची भाची आहे.निर्मल बोर्ड हे आहे. शी. नागभूषण विद्यालय बासर मध्ये ती शिक्षण घेत होती.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांने उपरोक्त यश मिळवल्यामुळे त्याच्या कौटुंबिक सदस्यासह धर्माबाद येथील मित्रपरिवारातही कौतुकाचा वर्षाव होत आहे. तसेच शाळेतचे सर्व शिक्षक ज्या प्रमाणे मेहनत घेतली आहे. व माझ्या आईने माझ्यासाठी खूप संघर्ष केला आहे त्याच्या मुळे



मी हे श्रीय माझ्या शाळेतल्या सर्व शिक्षकांना व माझ्या आईंना तसेच प्रा.पी. डी. गोनारकर मामा यांना जाते.

## उपमुख्याध्यापक भगवान केंद्रे यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न

### सेवापूर्ती सोहळ्या निमित्य किर्तनातून समाज प्रबोधन

**कंधार | प्रतिनिधी**

आजच्या विज्ञान युगात व बदललेल्या जीवनशैलीमध्ये सगळीकडेच बदल झालेला असतानाही शिक्षकांचे कार्य मात्र अजूनही दीपस्तंभासारखे प्रेरणादायी असून आज ही समाजामध्ये शिक्षकाचे स्थान अग्रस्थानी आहे शिक्षक हे समाजातील चालते बोलते विद्यापीठ असतात. त्यामुळे शिक्षकांनी अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांना बाहेरचे व्यवहारिक ज्ञानही द्यावे, बऱ्याच ठिकाणी आई-वडिलांची विभागणी झालेली पाहतो मुले हे आई-वडिलांना म्हातारपणी आधार देत नाहीत,असे रोजच वर्तमानपत्रांमध्ये वाचतो पण आज केंद्रे सरांच्या सेवापुर्ती कार्यक्रमाला त्यांच्या वडिलांचे वय झाले,असूनही उपस्थिती असल्यामुळे बरे वाटले असे आग्रही प्रतिपादन मा.संभाजीराव केंद्रे यांनी केले,

श्रीमती गंगाबाई प्राथमिक शाळा कंधार चे उपमुख्याध्यापक भगवान केंद्रे ३७ वर्ष प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत होत आहेत.त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा दि.३ मे शुक्रवार रोजी इच्छापूर्ती हनुमान मंदिर,संगमवाडी ता.कंधार जि.नांदेड येथे संपन्न झाला.

भगवान माधवराव केंद्रे यांचा सेवानिवृत्ती सोहळा त्यानिमित्ताने
ह.भ.प.प्रभाकर महाराज झोलकर (नाना) यांच्या भव्य किर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला.मृदंगाचार्य ह.भ.प.तालमनी नामदेव



**कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नामदेव केंद्रे,कृष्णा केंद्रे,माधव गोटमवाड,वाल्मीक केंद्रे,विजय उगले, दीपक गुट्टे,गजानन केंद्रे,अनिल केंद्रे,प्रकाश जक्कलवाड,व भगवान बाबा मित्र मंडळ संगमवाडी यांनी परिश्रम घेतले**

मा.केंद्रे आनंदवाडीकर यांची साथ लाभली आहे. गायक म्हणून ह.भ.प. गोपीनाथ गुरुजी केंद्रे यांची साथ लाभली तर कार्यक्रमाचे अध्यक्ष संभाजी पाटील केंद्रे (माजी उपसभापती,पं.स.कंधार व संचालक महात्मा फुले विद्यालय शेकापुर ) प्रमुख पाहुणे ह.भ.प.प्रभाकर महाराज झोलकर (नाना) , बालाजी डफडे ( माजी केंद्रप्रमुख, योगेश मुंडे, गोविंद मुसळे,डी.जि. वाघमारे (मुख्याध्यापक )वाघलगावे सर( मुख्याध्यापक ),महमद अन्सरोदीन ( मुख्याध्यापक) गोविंद मुंडे ( पी एस आय ) सुनील राठोड,डॉ.लक्ष्मण जायभाये,बाळू गर्जे,शंतनु कैलासे, डॉ.दिनकर जायभाये ,प्रवचनकार माधव मुसळे ,सूर्यकांत घुगे (जमदार) उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्ताविक कृष्णा भगवान केंद्रे यांनी मांडले ते म्हणाले की आपल्या वडिलांची इच्छा पूर्ण करण्यासाठी भारतीय सेना मधून देशाची सेवा करत आहे. त्यांनी मोठमोठ्या संकटाला तोंड देऊन आम्हाला घडविले अशा खडतर प्रवासामध्ये त्यांनी कोणत्याही संकटाला न जुमानता आम्हाला स्वतःच्या पायावर उभे केले.

म.फु.शि.प्रसारक मंडळ संस्थेचे संचालक अध्यक्ष मा.संभाजी पाटील केंद्रे यांनी आपल्या अध्यक्ष भाषणात म्हणाले की महात्मा फुले विद्यालय शेकापूर तसेच श्रीमती गंगाबाई बालक मंदिर कंधार या विद्येच्या मंदिरातून जवळपास ११००० विद्यार्थी घडवून मोठमोठ्या पदावरती कार्यरत असून ते वेगवेगळ्या पद्धतीने देशाची सेवा करत आहेत शिक्षक भगवान केंद्रे यांनी ज्ञानदानाच्या माध्यमातून त्यांनी अनेक विद्यार्थी घडविण्यात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांची ३७ वर्षाची प्रदीर्घ सेवा आज समाप्त होऊन ते कार्यमुक्त होत आहेत पुढील आयुष्यात अशीच त्यांच्याकडून सेवा घडत राहावी आणि त्यांना दीर्घायुष्य सुख समृद्धी लाभो असे ते म्हणाले. भगवान केंद्रे हे वयोमानानुसार २ मे रोजी सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचा सेवापूर्ती सोहळा संगमवाडी येथे साजरा करण्यात आला.यावेळी विद्यार्थी,पालक ,शिक्षक आणि प्रशासन यांच्याशी सलोख्याचे संबंध ठेवणे,माणसे जोडणे,विद्यार्थी घडवणे शैक्षणिक गुणवत्ता विद्यार्थ्यांना देऊन विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर करण्याचे काम त्यांनी ३७ वर्ष करून ते सेवानिवृत्त होत आहेत. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रत्नाकर केंद्रे यांनी केले तर आभार भगवान केंद्रे यांनी मानले या सत्कार सोहळ्याला श्रीमती गंगामाता प्राथमिक शाळेचा शिक्षक स्टॉप, सरपंच, उपसरपंच, शालेय समिती, ग्रामपंचायत सदस्य, गावातील अनेक शिक्षण प्रेमी, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नागरिक, महिला मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ डॉ.योगेश क्षीरसागरांच्या कार्यकर्ता मेळाव्यात दिसली ताकद

# बुद्धिभेद करणाऱ्यापासून सावध रहा ;सतर्क राहून आपापलं बुथ मजबूत करा-पंकजाताई

## बीडची सुज्ञ जनता पंकजाताईंच्या पाठिशी खंबीर-डॉ.योगेश क्षीरसागर








**बीड । प्रतिनिधी**

मी विकासाच्या मुद्यावर निवडणूकीचा प्रचार करत आहे. यापूर्वी पालकमंत्री असताना माझ्या विरोधात असलेल्या लोकांना कधीही मी त्रास दिला नाही, जातीपातीचे राजकारण कधीच केले नाही. विकास निधी सर्वांना दिला. कोणालाही दुखावले नाही. मात्र इतके सगळे चांगले असतानाही या निवडणूकीत काही जण जनतेचा बुध्दीभेद करु लागलेत , त्यांच्यापासून दूर रहा. विरोधक कोणताही मुद्दा नसल्याने आम्ही संविधान बदलणार अशी टिका आमच्यावर करत आहेत. बीड जिल्ह्यातील जनता सुज्ञ आहे ती विरोधकांच्या खोट्या प्रचाराला थारा देणार नाही. आम्ही सर्व समाजाचे आम्ही प्रतिनिधित्व करतो म्हणूनच मी विजयी होणार आहे, प्रत्येक कार्यकर्त्याने आपला बूथ सांभाळावा. डोळ्यात तेल घालून सतर्क राहून काम करावं. आपलं मताचे सत्पात्री दान मला द्यावे असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले. तर बीडची सुज्ञ जनता पंकजाताईंच्या पाठिशी खंबीरपणे उभी असल्याचे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी म्हटलं आहे.

राष्ट्रवादीचे बीड विधानसभेचे नेते डॉ.योगेश व डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या वतीने आयोजित विजयी संकल्प कार्यकर्ता मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. डॉ. योगेश क्षीरसागर,डॉ. सारिका क्षीरसागर,जनार्धन तुपे, प्रज्ञा खोसरे, कल्याण आखाडे, बाप्पासाहेब घुगे, सुनील झोडगे, सुधीर काकडे, भास्कर जाधव यांच्यासह नगर पालकेचे सभापती, नगरसेवक, विविध सेवा सहकारी सोसायटीचे पदाधिकारी उपस्थित होते.कार्यकर्त्यांशी संवाद साधताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या,मी पालकमंत्री असताना जिल्ह्यासाठी राष्ट्रीय महामार्गासह राज्य मार्गाचे कामे केली. यासह अनेक योजना राबवल्या, हे काम जनतेला दिसते.त्यामुळेच पाच वर्ष मी सत्तेसोबत नसतानाही माझी जनता माझ्यासोबत राहिली. ही निवडणूक बीड जिल्ह्याच्या विकासासाठी आहे, सर्व समाजाला पुढे घेऊन जाण्यासाठी आहे. सन्मानाचा विजय मिळवून देण्यासाठी तुमचे योगदान या निवडणुकीत मला द्या. आपला विकासाचा विचार गावागावात पोहचला आहे. लोक आता मतदानासाठी उत्साहित आहेत. आजपर्यंतच्या राजकारणात आम्ही कधी कुणाचा द्वेष केला नाही, विकास आणि आपल्या जिल्ह्यातील सर्व समाज घटकांच्या हितासाठी काम केलं आहे. जिल्ह्यात मी ठिकठिकाणी मतदारांना मते मागत असताना त्यांचा प्रतिसाद उत्स्फूर्त आहे. साडेतीन खासदारांच्या मागे उभे राहायचे की ३५० पेक्षा जास्त खासदार निवडून येणार्या पक्षासोबत रहायचे हे जनतेला चांगले कळते. मुंडे साहेबाचे अधुरे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपल्याला येत्या ४ तारखेला विजयी सभा घ्यायची आहे. निवडणूक ही देशाची आहे. देशाचे नेतृत्व पुन्हा एकदा लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्याकडे जाणार आहे, त्यामुळे या निवडणुकीत आपल्या जिल्ह्याचा सर्वांगीण विकास समोर ठेवून मतदारांनी इतर कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता भाजपला मतदान करावे. तुमच्या गावात तुमची किती मते आहेत हे या निवडणुकीत दाखवून देण्याची संधी कार्यकर्त्यांना आहे. जातीपातीचे राजकारण करणार्यापासून दूर रहा. मला प्रचंड मतांनी विजयी करून दिल्लीला पाठवा असे आवाहन केले. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मताधिक्य वाढवण्यासाठी बूथ मजबूत करण्याचे काम करावे, लवकरच मोदींजींची बीडला सभा होत आहे.या सभेला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन त्यांनी केले.जिल्हयात सात लाख हेक्टर जमीन कोरडवाहू आहे ही सर्व जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी आपण पंकजाताई याना विजयी करा. महायुती म्हणून आम्ही सर्वजण एकदिलाने काम करत आहोत. जिल्ह्यात विकासाचे, सिंचनाचे अनेक प्रकल्प राबवत आहोत, राजकारणात मी सक्रिय झालो तेव्हा बीड जिल्ह्यात कधीच जातपात नव्हती. सर्व जातीचे लोक बीडमधून खासदार झाले, हा बीड जिल्ह्याचा सर्वधर्मसमभावाचा राजकीय इतिहास आहे. इथे जात पाहून नव्हे तर व्यक्तीचे कर्तृत्व पाहून उमेदवाराला निवडून देणारी जनता आहे. कोणी कोणाच्या जातीत जन्माला यावं हे आपल्या हातात नसत. त्यामुळे जातिवादाला महत्व देऊ नका. देश विकासासोबत जिल्ह्याचा विकास करण्यासाठी ही निवडणूक आहे. पंकजाताई मुंडे यांना खासदार म्हणून मोदींजींच्या पाठीशी उभे करा.पंकजाताई आपल्या रूपाने ही लक्ष्मी बीड जिल्ह्यात यावी. आम्हाला सारे जण विचारतात की, तुम्ही खूप मनावर घेऊन प्रचार करतात, आम्ही सांगतो की, आम्हाला पंकजाताई यांना केंद्रात मंत्री म्हणून काम करताना पहायचे आहे, त्यामुळे आम्ही या निवडणुकीत ताईंसाठी १०० टक्के काम करणार आहो. पंकजाताई म्हणजे विश्वसनीय आणि आदरणीय व्यक्तिमत्त्व आहेत. क्षीरसागर परिवार आणि मुंडे परिवारांचे नाते घट्ट राहिलेले आहे. तसेच सर्व कार्यकर्ते आज आपल्या परिवारात आहेत. हे सर्व कार्यकर्ते तळागाळातील आहेत. सामान्य माणसांशी यांची नाळ जुळलेली आहे त्यामुळे पंकजाताई यांचा या निवडणुकीत विजय निश्चित आहे.आम्ही सर्वांनी मनावर घेतले आहे, पंकजाताई यांचा विजय निश्चित आहे. लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या हाती देशाचे हित आहे आणि त्यांचे हात मजबूत करण्यासाठी आपल्याला पंकजाताई मुंडे यांना निवडून आणायचे आहे.मोदींजींनी पंकजाताई मुंडे यांना केवळ खासदार करण्यासाठी उमेदवारी दिली नाही तर त्यांना केंद्रात मंत्रिपद मिळणार आहे त्यामुळे बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पंकजाताई यांना विक्रमी मतांनी विजयी करायचे आहे. पालकमंत्री असताना पंकजाताई यांनी ग्रामीण रस्ते तसेंच इतर विकासाच्या योजना बीड जिल्ह्यात आणल्या,त्यांच्या कार्यकाळात बीड जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांची विकास कामे झाली हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात आताही बीड जिल्ह्यात विकास कामाचा वेग कायम आहे, समोरच्या उमेदवाराचे कोणतेही काम नाही,त्यामुळे ते काय काम करणार हे दिसून येते. आपला विकास कोण करू शकते हे बीडच्या जनतेला चांगले कळत म्हणूनच पंकजाताई मुंडे यांना विजयी करायचे आहे. पंकताईंनी कधीही जातीभेद केला नाही. त्यामुळे बीडची जनता येत्या १३ तारखेला पंकजाताई यांना विक्रमी मतदान करेल आणि ४ जून रोजी पंकजाताई मुंडे या प्रचंड मतांनी विजयी झालेल्या असतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# विश्वधर्मी प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड यांना मानद डी.लिट.प्रदान

**मुंबई । रवींद्र मालुसरे**



यूएसए, उटाह येथील ब्रिघम यंग युनिव्हर्सिटी (बीवाययू) तर्फे विश्वधर्मी प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड यांना मानद डी.लिट.प्रदान पुणे, दि. २६ एप्रिल : शिक्षण आणि मानवतेच्या दीर्घकाळ समर्पित सेवेसाठी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांना यूएसए, उटाह येथील ब्रिघम यंग युनिव्हर्सिटीतर्फे (बीवाययू) मानद डी.लिट. पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले. बीवाययूचा २०२४ बॅचच्या दीक्षांत समारोह गुरूवारी २५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी बीवाययूचे अध्यक्ष डॉ. सी.शेन रीस, एल्डर डी टॉड क्रिस्टोफरसन, एल्डर रोनाल्ड रासबँड, एल्डर गेरिट गाँग, रॉन गनेल, रिचर्ड नेल्सन, किंग हुसेन, डॉ. अशोक जोशी आणि बोर्डाचे इतर विश्वस्त सदस्य उपस्थित होते. डीलिट पदवी प्रदान करताना अध्यक्ष सी शेन रीस यांनी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उत्तुंग कार्याचे कौतूक केले. तसेच आंतरधर्मीय संवादातून विश्वशांती स्थापनेला देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचाचे कौतुक केले. डीलिट स्वीकारल्यानंतर विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, शिक्षणात वैश्विक मूल्याधिष्ठीत शिक्षणाचा अंतर्भाव करणे गरजेचे आहे. त्यातूनच वसुधैव कुटुम्ब कम आणि विश्वशांतीचे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. मन, बुद्धी, आत्मा आणि शरीर हे निसर्ग तत्व आहे. आज शरीर आणि बुद्धी यावर सखोल संशोधन होत आहे. परंतू आत्मा आणि मनाच्या शिक्षणाचा विचार झालेला दिसत नाही. जगात शांती नांदायची असेल तर अध्यात्माबरोबरच मन आणि आत्म्याचा अभ्यास होणे गरजचे आहे. अमेरिकेतील आघाडीचे विद्यापीठ बीवायू व एमआयटी डब्ल्यूपीयू यांच्यात सहकार्य निर्माण व्हावे, तसेच जगात शांती संस्कृती प्रस्थापित करण्यासाठी मूल्याधारित शिक्षण प्रणालीच्या संकल्पनेला चालना देण्यासाठी जगातील इतर विद्यापीठांचाही समावेश होईल. अशी डॉ. कराड यांनी आशा आहे. माझ्या जीवनावर महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यासारख्या थोर तत्वज्ञ संताचा आणि डॉ. अल्बर्ट आइनस्टाईन सारख्या शास्त्रज्ञांचा चिरस्थायी प्रभाव पडला आहे. माझी मोठी बहिण प्रयागअक्का कराड यांचा ही प्रभाव आहे. त्याच प्रमाणे स्वामी विवेकानंद यांच्याकडून मिळालेल्या प्रेरणेमुळे जीवनाला नवी दिशा मिळाली आहे. असे उद्गार डॉ. विश्वनाथ कराड यांनी या प्रसंगी काढले. या समारंभात बीवायूच्या १५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये विविध विषयातील पदवी पदव्युत्तर आणि डॉक्टरेट पदव्यांचा समावेश होता. या दीक्षांत समारोहात सुमारे २५ हजार नागरिक उपस्थित होते.

# पप्पू शिंदे यांची एम पी डी ए मधून ८ दिवसात मुक्तता

## ॲड.विशाल कदम यांनी केलेला युक्तिवाद यशस्वी

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आंदोलक पप्पू शिंदे यांना लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर एम.पी.डी.ए कायदा १९८१ अंतर्गत दि. २४ एप्रिल रोजी जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशाने मध्यवर्ती कारागृह हर्सूल छत्रपती संभाजी नगर येथे स्थानबद्ध करण्यात आले होते. सदरील आदेश पारित करीत असताना कायद्यामधील सर्व प्रक्रिया पूर्ण झाली नसल्यामुळे त्याविरुद्ध ड. विशाल कदम यांच्या मार्फत आक्षेप दाखल करण्यात आला होता. त्यावर जिल्हाधिकारी यांनी सुनावणी घेऊन स्थानबद्ध पप्पू शिंदे यांना तातडीने मुक्त करण्याचे आदेश पारित केले आहेत, यामुळे मराठा आंदोलकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

सविस्तर वृत्त असे की, बीड शहरामध्ये मराठा आंदोलनाच्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर जाळपोळ झाली, आमदारांच्या घरासह सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यालयांना आग लावण्यात आली. त्यामध्ये पप्पू शिंदे यांना मुख्य आरोपी करण्यात आले होते. त्या प्रकरणात त्यांना अटक देखील झाली व रीतसर न्यायालयाने त्यांना जामीन देखील दिला मात्र त्या गुन्ह्यांचा आधार घेऊन व दोन गोपनीय साक्षीदारांच्या जबाबामुळे बीड शहर पोलीस स्टेशन यांच्यामार्फत एम पी डी ए १९८१ कायद्याअंतर्गत कारवाई करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी १९ एप्रिल २०२४ रोजी मंजूर केला. त्यानुसार २४ एप्रिल २०२४ रोजी पप्पू शिंदे यांना कारवाई करून स्थानबद्ध करण्यात आले. सदरील कायद्यामधील कलम ३(३) अनुसार स्थानाबद्दल प्राधिकार्याने तातडीने सदरील प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरी करिता पाठवणे बंधनकारक आहे, व तो प्रस्ताव १२ दिवसांच्या आत मंजूर करणे राज्य शासनाला बंधनकारक आहे असे न झाल्यास सदरील आदेश अमलात राहणार नाही अशी तरतूद कायद्यामध्ये आहे.स्थानबद्ध प्राधिकार्यांकडून प्रस्ताव २३ एप्रिल २०२४ रोजी राज्य शासनाकडे पाठविण्यात आला, मात्र त्याला मंजुरी मिळाली नाही. कायद्यातील तरतुदींचा आधार घेऊन उच्च न्यायालयातील ड विशाल कदम यांनी याबाबत स्थानाबद्द प्राधिकारी म्हणजेच जिल्हादंडाधिकारी यांच्या न्यायालयात आक्षेप दाखल केला. पप्पू शिंदे यांचे वर केलेली कार्यवाही ही नियमबाह्य असून कायद्यातील प्रक्रियेचे उल्लंघन करणारी आहे, तसेच त्यामुळे भारतीय संविधानातील कलम २१ व २२ (२) चे उल्लंघन करणारी आहे; त्यामुळे त्यांना तातडीने मुक्त करण्याचे आदेश पारित करण्याची मागणी करण्यात आली होती. रीतसर प्रस्तुत प्रकरणावर सुनावणी होऊन स्थानबद्ध प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी पप्पू शिंदे यांना मुक्त करण्याचे आदेश पारित केले आहेत. मराठा आंदोलनातील प्रमुख नेत्यांपैकी पप्पू शिंदे हे एक प्रमुख असल्याने मराठा आंदोलकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.बीड जिल्ह्यात आजवर शेकडो कारवाया एम पी डी ए कायद्याअंतर्गत झाल्या, त्यामध्ये अनेक महिने सदरील इसमांना स्थानबद्ध राहावे लागले आहे व अनेक अजून देखील कारागृहातच आहेत. पप्पू शिंदे यांच्या प्रकरणात मात्र गंभीर कायदेशीर व संविधानिक बाब न्यायालयाच्या निर्दर्शनास आणून दिल्याने त्यांची सुटका तांत्रिक बाबीमुळे झाली असून यामुळे प्रशासनाला धडा मिळाला आहे असेच म्हणावे लागेल.

# न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्या प्रकरणात सरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल

**जिंतूर । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील मारवाडी येथील विलास गणेशराव देशमुख यांनी जिंतूर न्यायालयात अनंता बन्सीधर देशमुख, पवन प्रसादराव देशमुख आणि मदन प्रभाकर देशमुख यांचे विरुद्ध त्यांनी संगणमत करून ग्रामपंचायतचे पाईपलाईन फोडण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून त्यांचा भाऊ कल्याण गणेशराव देशमुख यांचा खून करून पुरावा नष्ट केल्याबद्दल फौजदारी व्यवहार संहिता कलम १५६ (३) नुसार ऍड. मनोज सारडा यांच्यामार्फत प्रकरण दाखल केले सदर प्रकरणात माननीय न्यायाधीश श्रीमती वेदवती आद्य देशपांडे यांनी पोलीस स्टेशन बोरी यांना प्रकरणात भादवी ३०२ व इतर कलमा अन्वये संबंधितावर गुन्हा दाखल करून अहवाल सादर करावा असे आदेश दिले आहेत.

घटनेची थोडक्यात माहिती अशी की, दिनांक १८ नोव्हेंबर २०२३ रोजी मयत कल्याण देशमुख यांनी मारवाडी येथील ग्रामपंचायत ची पाईपलाईन फोडली या कारणावरून सरपंच अनंता देशमुख व त्यांचे सहकारी पवन आणि मदन यांचे सोबत त्यांचा वास झाला त्यावेळी सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी कल्याण तुझी पाहून घेतो असे धमकावले. त्यानंतर दिनांक १९ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी नऊ वाजता फिर्यादी त्याच्या शेतात जात असताना आरोपी त्यांना गावातील मंदिराजवळ भेटले आणि कल्याणला समजावून सांगा की आमच्या नादाला लागू नको नाहीतर परिणाम वाईट होतील असे म्हणून कल्याणच्या घराच्या दिशेने गेले. फिर्यादी दुपारी शेतातून परत आला असता त्यास त्याच्या आईने सांगितले की कल्याणच्या शेजारी जाणाऱ्या महिलेने आरोपी यांनी घरात मारहाण केली आहे त्यावरून फिर्यादी यांनी आरोपी यांना त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधून तुम्ही कल्याणला का मारले असे विचारणा केली असता त्यांनी केवळ आम्ही त्याला थापड बुक्क्या मारल्या असे सांगितले त्यामुळे फिर्यादी व त्याची आई कल्याणच्या घराकडे गेले असता त्या ठिकाणी तो जाण्यापूर्वीच बोरी पोलीस स्टेशनचे फौजदार खिल्लारे साहेब व कर्मचारी आलेले होते त्या ठिकाणी आल्यानंतर फिर्यादी यास त्याच्या भावाची बॉडी घराच्या छताला स्कार्फ बांधून लटकवलेली दिसली तसेच जमिनीवर रक्त सांडेल दिसले. त्या ठिकाणी पोलिसांनी घटनास्थळाचे फोटो घेतले आणि प्रेत खाली घेतले. ज्या ठिकाणी घटना घडली त्या ठिकाणी खो सरलीमध्ये कोणतेही स्टूल अथवा उंच चढण्याइतपत वस्तू नव्हती. मताची पत्नी माहेरी मौजे पुंगळा येथे गेलेली असल्यामुळे फिर्यादीने सदरची घटना वनिता यांना कळवली. त्यानंतर प्रेत सरकार दवाखाना बोर येथे आणले गेले. बोरी येथे दवाखान्यात प्रेत आल्यानंतर आरोपी यांनी संगणमत करून फिर्यादीचा भाव कल्याण याने मराठा आरक्षणाच्या निर्णयाबाबत शासन उशीर करत असल्यामुळे जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या लढ्याला पाठिंबा म्हणून आत्महत्या केल्याची वावडी उठवली. त्या रात्री फिर्यादी पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यात गेला असता पोलिसांनी त्यास पोलीस स्टेशनमध्ये बसून ठेवले आणि त्यांची फिर्याद दिनांक २० नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी लिहून घेतली सदरची फिर्या देत असताना आरोपी अनंता देशमुख यांनी त्याच्या मोबाईलवरून फिर्यादीला त्याच्या मोबाईलवर संपर्क साधून गुन्हा दाखल करू नका आपण मिटवून घेऊ अशी विनंती केली सदरचे मोबाईल रेकॉर्डिंग सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर व पोलिसांना दिली परंतु पोलिसांनी त्याबाबत कोणतीही गंभीर कार्यवाही केली नाही. तसेच तुमच्या तक्रारीप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे असे सांगून फिर्यादीस प्रेत गावाकडे घेऊन जावा अंत्यविधी ऊर्का असे म्हणून घरी जाण्यास सांगितले. त्यानंतर धार्मिक विधी पूर्ण झाल्यावर फिर्यादी पोलीस स्टेशनला आले असतात त्यांना माहिती मिळाली की सरला गाडेकर या पोलीस अधिकाऱ्याने आरोपी यांच्यासोबत संगणमत करून कोणताही गुन्हा दाखल केला नाही त्यामुळे फिर्यादी याने पाठपुरावा करून पोलीस उपाधीक्षक जिंतूर, पोलीस अधीक्षक परभणी आणि विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड यांचे कडे लेखी तक्रार दिली परंतु त्यानंतर देखील गुन्हा दाखल होत नसल्यामुळे शेवटी त्यांना न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय जिंतूर येथे तक्रार दाखल करावी लागली. सदरची तक्रार दाखल करत असताना मयतावर झालेल्या पोस्टमार्टम अहवालात संशयास्पद पुराव्याची माहिती, आरोपी यांच्यासोबत मोबाईल मध्ये झालेले संभाषण व इतर सर्व पुरावे दाखल करण्यात आले. फिर्यादी यांचे तर्फे ऍड. मनोज सारडा यांचा युक्तिवाद आणि प्रकरणात दाखल प्रथम दर्शनी सर्व पुराव्यांचा विचार करून न्यायाधीश श्रीमती वेदवती आद्य देशपांडे यांनी आरोपी यांचे विरुद्ध भादवी ३०२ व इतर कलमा अन्वये गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिनांक ०३/०५/२०२४ रोजी दिले आहेत.

प्रकरणाचा क्रमांक

फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ४४/२०२४

विशेष म्हणजे प्रस्तुत प्रकरणात सरला गाडेकर यांना तत्कालीन पोलीस अधीक्षक यांनी सखोल चौकशी करून गुन्हा दाखल करण्याबाबत तोंडी आदेश दिलेले होते असे असताना त्यांनी प्रस्तुत प्रकरणात आरोपी यांच्या राजकीय व आर्थिक दबावापोटी गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे प्रकरणाची चौकशी सीआयडीमार्फत होऊन दिनांक १९ नोव्हेंबर २०२३ ते आज पर्यंत सरला गाडेकर यांच्या मोबाईल मधून आरोपी व त्यांच्या नातेवाईकांसोबत झालेल्या संभाषणाची सीडीआर, सीसीटीव्ही कॅमेरा मधील फुटेज तपासून आरोपींना वाचवण्यासाठी पुरावा नष्ट करण्यास मदत केल्याबद्दल त्यांचेवर देखील गुन्हा दाखल करून न्याय द्यावा असे फिर्यादी यांनी वार्ताहर यांना बोलताना सांगितले आहे. जर वरिष्ठांनी संबंधित फौजदाराविरुद्ध कार्यवाही न केल्यास लवकरच माननीय उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर येथे याचिका दाखल करणार असल्याचे सांगितले आहे.

# महिला मतदार; मतदान करणार;परिपूर्ण लोकशाहीसाठी महिलांचा सहभाग आवश्यक-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

परिपूर्ण लोकशाहीसाठी त्यात महिलांचा सहभाग आवश्यक आहे. महिलांनी आपला मतदानाचा हक बजावतांना आपल्या कुटुंबातील आपल्या परिसरातील लोकांनाही मतदान करण्यास प्रेरित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

१०८ औरंगाबाद (पश्चिम) विधानसभा क्षेत्रातील महिला मतदारांचा मेळावा सेंट फ्रान्सिस हायस्कूल येथे आयोजित करण्यात आला होता. सहा. निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना खेतमाळीस, स्वीप नोडल अधिकारी सुदर्शन तुपे, शिक्षणाधिकारी जयश्री

चव्हाण, तहसिलदार रमेश मुनलोड, माविम प्रकल्प संचालक चंदनसिंग राठोड, गटशिक्षणाधिकारी दीपाली थावरे आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की,



राष्ट्राची प्रगतीही त्या राष्ट्राच्या विकासात महिलांचा सहभाग कितपत आहे यावर अवलंबून आहे. महिलांना अबला समजू नये, त्या सबला आहेत. बुद्धी, शक्ती, आर्थिक असे सर्वसामध्ये महिलांपाशी आहे. उलट पुरुष हे महिलांच्या आधाराशिवाय पुढे जाऊ शकत नाही. विकसित आणि सामर्थ्यवान लोकशाहीसाठी महिलांचा सहभाग आवश्यक आहे, असे जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले.

लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानातही महिलांचा सहभाग आवश्यक आहे. मतदानाचे प्रमाण हे

परिपूर्ण लोकशाहीसाठी आवश्यक आहे. महिलांनी स्वतः तर मतदान करावयाचे आहे. शिवाय आपल्या कुटुंबाचे शेजारी, आपल्या भागातील लोकांनाही मतदान करण्यासाठी सांगावयाचे आहे. एकदा श्री शक्तीने निर्धार केला तर नक्कीच मतदानाचे प्रमाण वाढणार, असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी मिनाक्षी राऊत व ज्योती घोरपडे वा महिलांनी आपले विचार व्यक्त केले. प्रास्ताविक अर्चना खेतमाळीस यांनी केले. जयश्री चव्हाण व सुदर्शन तुपे यांनीही उपस्थित महिलांना संबोधित केले. त्यानंतर 'हम मतदार है' या गीतावर नृत्य सादर झाले. उपस्थितांना मतदानाची प्रतिज्ञा देण्यात आली. रोहिणी पिंपरखेडकर यांनी सूत्रसंचालन तर दीपाली थापरे यांनी आभारप्रदर्शन केले.

# सरपंचाना दिली मतदान केन्द्राध्यक्षपदी नियुक्ती

**पैठण (प्रतिनिधी)**-एका राजकीय पक्षाचा कार्यकर्ता असलेल्या सरपंच, शिक्षकाची निवडणूक विभागाने केंद्राध्यक्षपदी निवड केल्याचे नुकतेच समोर आले आहे. त्यामुळे राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. दरम्यान, ही नियुक्ती रद्द करण्यात यावी, अशा आशयाचा लेखी अर्ज सदर सरपंचाने पैठण तहसील कार्यालयातील निवडणूक विभागाकडे देऊनही याबाबत अद्यापपर्यंत निर्णय झालेला नाही.

पैठण तालुक्यातील आडुळ बुद्रुक येथील शिक्षक बबन भावले हे नांदर येथील एका संस्थेच्या शाळेवर शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. तसेच ते गावचे सरपंच म्हणून निवडून आलेले आहेत. याशिवाय ते उबाठा गट या राजकीय पक्षाशी संबंधित असून ते काम करत आहेत. तरीदेखील २२ मार्च रोजी जालना लोकसभेच्या निवडणुकीसाठी त्यांना मतदान केंद्राध्यक्ष म्हणून नेमणुकीचे पत्र तहसील कार्यालयातील निवडणूक विभागाने दिले आहे. या पदाचे पहिले प्रशिक्षण घेतल्यानंतर भावले यांनी सदर नियुक्ती रद्द करण्याबाबतचा अर्ज सहायक निवडणूक निर्णय अधिकारी

मतदान केंद्राध्यक्ष पदाचे पहिले प्रशिक्षण झाल्यानंतर मी या नियुक्तीबाबत रद्दचा अर्ज निवडणूक विभागाकडे दिलेला आहे. मात्र अद्यापपर्यंत मला या पदाच्या नियुक्तीच्या रद्दबाबत काहीही पत्र आलेले नाही. -

बबन भावले, सरपंच, आडुळ बुद्धक

मतदान केंद्रावर कामे करण्यासाठी कर्मचाऱ्यांची संख्या कमी पडत आहे. त्यामुळे याकामी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना शिक्षक नियुक्तीचे अधिकार आहेत. त्यानुसार बबन भावले यांची मतदान केंद्राध्यक्ष म्हणून नियुक्ती झालेली आहे. त्यांनी पद रद्दचा अर्ज आमच्याकडे पाठविलेला आहे. त्यानंतर याबाबतचा प्रस्ताव आम्ही वरिष्ठांकडे पाठविला. परंतु त्याबाबत अजून काहीच उत्तर मिळाले नाही.

-नीलम बाफना, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, पैठण

अधिकारी यांना दिला आहे. परंतु अद्यापही शिक्षक सरपंचाची नियुक्ती रद्द झाली नाही. अशा निर्णयामुळे आचारसंहितेचा भंग होत नाही काड असा सवाल जनतेतून होत आहे,

# भारताच्या ग्रामीण भागातील सीए विध्यार्थ्यांना अभ्यासाच्या सर्व सोयी उपलब्ध करून देणार भारतीयसीए अध्यक्ष रणजितकुमार अग्रवाल

**जालना । प्रतिनिधी**

संपूर्ण भारताच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सीए बनवण्यासाठी सर्व सोयी उपलब्ध करून देणार असे द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया नवी दिल्लीचे अध्यक्ष श्री रणजीत कुमार अग्रवाल यांनी सांगितले ते जालना येथे सीएच्या विद्यार्थ्यांना लायब्ररीच्या उद्घाटनासप्रसंगी बोलत होते. या वेळी त्यांच्या बरोबर सीएइन्स्टिट्यूट दिल्ली चे उपाध्यक्ष चरणज्योत सिंग नंदा तथा बोर्ड ऑफ स्टडीज चे अध्यक्ष राजकुमार अडूकीया उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर त्यांच्याबरोबर सेंट्रल कौन्सिल मेंबरसीए उमेश शर्मा, सीए अर्पित काबरा, सीए रूपाली बोथरा, सीए

पियुष चांडक, सी ए केदर पांडे, सीए गौरव गिन्दोडीया उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा संचलन सीए आकाश मुंदडा यांनी तर आभार प्रदर्शन सीए शुभम मुंदडा यांनी केले. याप्रसंगी उपाध्यक्ष सीए चरण ज्योत सिंग नंदा तथा जालना शाखेचे अध्यक्ष गौरव गिन्दोडीया यांनीही आपले विचार मांडले पुढे बोलताना सीए रणजीत कुमार अग्रवाल म्हणाले भारताच्या प्रगतीमध्ये सीएचा फार मोठा सहभाग आहे. भारताची लोकसंख्या १३० कोटी पेक्षा जास्त आहे मात्र सीए जवळपास पाच लाख आहे ही टक्केवारी फार कमी असून अजून

भारतात सीएची आवश्यकता असल्याचे ठासून सांगितले. यावेळी उपाध्यक्ष सीए शांती मोतीवाला, सीए मधु भक्कड, सीए गोपाळराव, सीए आतिष काबरा, सीए आशिष पिती, सीएप्रसाद राव, सीए बिजल भायानी, सीए प्रीती पारिख, सीए राजेंद्र मानधना, सीए नटवर मर्दा, सीए निलेशश्रोत्रिय, सीए कल्पेश लड्डा, सीए अभिजित भुतडा यांच्यासह अनेक सीए उप- स्थित होते. सीए इन्स्टिट्यूट नवी दिल्ली येथील अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि बोर्ड ऑफ स्टडीजचे अध्यक्ष एकाच वेळी पहिल्यांदाच जालन्याला आले होते. याची चर्चा होती जालनाच्या सर्व टीम मेंबर्सनी परिश्रम घेतले होते.

# वतीने २९ बटूंचे उपनयन संस्कार सोहळा

**जालना । प्रतिनिधी**

ब्राह्मण समाजामध्ये १६ संस्कारांपैकी एक महत्त्वाचा असलेला उपनयसंस्कार आहे मैत्रेय ग्रुप ब्राह्मण समाज जालना यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रविवार दिनांक २८ रोजी सामूहिक उपनयन संस्कार सोहळा पार पडला. या सोहळ्यामध्ये २९ बटुंबर उपनयन संस्कार करण्यात आले. दिवसेंदिवस वाढत जाणारा खर्च आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विखुरलेले कुटुंब, वेळेचा अभाव यामुळे या संस्कार सोहळ्याकडे दुर्लक्ष होत आहे. ही बाब लक्षात घेऊन मैत्रेय ग्रुप ब्राह्मण समाज जालरा गेल्या काही वर्षांपासून जालना येथे सामूहिक उपनयन संस्कार सोहळा आयोजित करीत आहे. रविवारी पार पाडलेल्या

या सामूहिक उपनयन संस्कार सोहळ्याला सखाराम महाराज संस्थान लोणी येथील कल्याण महाराज जोशी, नाथसेवक शिवणगिरीकर महाराज बडोद कान्होबा, रामदास महाराज आचार्य, नाना महाराज पोखरीकर, अनंत महाराज देशपांडे, विनायक महाराज फुलंब्रीकर या महंतांची बटूंना आशीर्वाद देण्यासाठी उपस्थिती होती. अत्यंत उत्साहाच्या बातावरणामध्ये बटूंना वेगवेगळ्या बगीमध्ये बसवून शहरातून मिरवणूक काढण्यात आली. यथोचित सर्व सोपस्कार पूर्ण करून हा उपनयन संस्कार सोहळा पार पडला. यावेळी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, भास्करराव आआंबेकर भास्करराव दानवे, राजेश

राऊत, आदि राजकीय मंडळी देखील उपस्थित होती. या संस्कार सोहळ्यासाठी उपस्थित राहणाऱ्या सर्व नातेवाईकांसाठी डॉ. मकरंद बोठे यांच्या वतीने मोफत उष्माघात प्रतिबंधक औषधीचेही वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीकरण्यासाठी मैत्रेय ग्रुप ब्राह्मण समाज जालनाचे अध्यक्ष संतोष दाणी तर या सामूहिक उपनयन संस्कार समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. पवन देशमुख यांनी परिश्रम घेतले. बया उपनयन संस्कारामध्ये बटूंना सर्व साहित्य देण्यात आले होते त्यामध्ये सोवळे, संध्या पात्र, संध्येचे पुस्तक तसेच या सोहळ्यासाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य आणि पुरोहित देखील समितीच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आले होते.

# आचारसंहिता पथकाने दारू पकडली



**पैठण । प्रतिनिधी**

पैठण तालुक्यातील फारोळा तांडा येथील हॉटेलवर छापा टाकत देशी दारूचा अवैध साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी एका आरोपीस अटक करुन त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे, अशी माहिती आचारसंहिता पथकप्रमुख तथा नगर परिषद प्रशासक संतोष आगळे यांनी दिली. जालना लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली आहे.

फारोळा तांडा येथील एका हॉटेलवर देशी दारू विक्री केली जात असल्याची तक्रार आली होती. त्यानुसार दारुबंदी व उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक शिवराज वाघमारे यांनी आचार संहिता पथकाला ही माहिती दिली. यावेळी अवैद्यरीत्या बाळगण्यात आलेला ८.६ लिटर देशी दारूचा साठा जप्त करण्यात आला. य

।। कारवाईमध्ये दारुबंदीचे दुय्यम निरीक्षक शिवराज वाघमारे, आचारसंहिता पथकप्रमुख संतोष आगळे सदस्य

तथा पंचायत समितीचे पाणीपुरवठा विभाग प्रमुख राजेश कांबळे, एफ.एस.टी. पथक प्रमुख संकेत जारवाल, राहुल वाघ पोलीस शिपाई वसावे, गुनावत व अथर्व बावनेर यांनी सहभाग घेतला.

# जिल्हाधिकाऱ्याऱ्यांनी नैतिक जबाबदारी घेऊन राजीनामा द्यावा-ॲड.महेश धन्नावत सातबारा स्वतंत्र करणेबाबत आदेश

**जालना । प्रतिनिधी**

येथे महसुल विभागात दररोज भ्रष्टाचार संदर्भात बातमी प्रकाशित होत आहे. विशेष म्हणजे जालना जिल्ह्यात नोंदणीकृत दस्ताआचार फेरफार घेतली जात नाही, दुहेरी सातबारा पद्धत अस्तित्वात आहे. अकृषितक झालेल्या मिळकत संदर्भात वेगळे पी. आर. कार्ड किंवा सातबारा तयार केले जात नाही. जमाबंदी आयुक्त आणि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांनी ही मार्गदर्शन सुचना क्रमांक १२६/२०२० अन्वये वेगवेगळ्या भुधारण असलेल्या जमिनीची व शेती आणि बिनशेतीचे


दिलेले असतांना प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. दररोज जालना येथे महसुल कार्यालयातील अधिकारी हे अन्टी करप्शन मध्ये धरले जात आहे. लोकांनी महसुल विभागा संदर्भात तक्रार केली तरी त्याची दखल घेतली जात नाही व जिल्ह्याधिकाऱ्यांचा वचक राहिलेला नाही. महसुल अधिनियम १५१ ते १५४ प्रमाणे नोंदणीकृत दस्त आधारे नामांतर होणे गरजेचे असतांना असे प्रत्यक्षात होत नाही. मा. लोकआयुक्त यांनी सुद्धा जिल्हाधिकारी यांना या बाबतकळविलेले आहे व आदेशत स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे की, नामांतर साठी विलंब होत असल्यास भ्रष्टाचार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी देखील महसुल अधिकारी हे त्यांच्या पाठीशी एकाप्रकारे जिल्हाधिकारीच उभे असल्याचे ग्रहीत धरुन मनमोकळ्यापणाने भ्रष्टाचार करीत आहे व नोंदणीकृत दस्ताआधारे फेरफार घेत नाही. त्यामुळे नैतिक जबाबदारी धरुन जिल्हाधिकारी साहेबांनी स्वतः राजीनामा द्यावा, असे मत अँड. महेश धन्नावत यांनी व्यक्त केले.

# वार्षिक यात्रा महामहोत्सवाचे आयोजन भगवान मुनीसुव्रतनाथांचा महामस्तक अभिषेक सोहळा

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

श्री १००८ मुनीसुव्रतनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र पैठण येथे दि.३ मे रोजी वार्षिक यात्रा महामहोत्सव निमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे क्षेत्राचे अध्यक्ष महावीर बडजाते, महामंत्री विलास पहाडे व कोषाध्यक्ष विजय पापडीवाल यांनी एका पत्रकाव्दारे माहिती दिली. लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री मुनीसुव्रतनाथ दिगंबर जैन मंदीर येथे ३ मे रोजी भगवंताचा जन्म व तप कल्याणक निमित्त वार्षिक यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.३ मे, २०२४ रोजी सकाळी शोभायात्रा काढण्यात येईल, तदनंतर बोलीया प्रारंभ होईल, ९.३० वा. भगवान मुनीसुव्रतनावांचा महामस्तक अभिषेक सोहळा होईल. तसेच सध्यांकाळी ७.०० वा. भगवंताचा पाळणा व महित्य मंडळाच्या वतीने सांस्कृति कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. संपूर्ण कार्यक्रम हा अंर्तमना आचार्य प्रसत्रसागरजी महाराज मांच्या आशीर्वादाने आयोजीत करण्यात आला आहे. यात्रा

✲ महोत्सवासाठी उपस्थित हजारो भाविकांना कैलासचंद किसनलाल काला, सौ छाया, विशाल, मोनाली काला परिवार, आपेगाववाला व भाऊसाहेब गुणधरराव धोंगडे व छाया, अमोल, साक्षी धोंगडे परिवार जालना यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे. क्षेत्रावर प्रत्येक महिन्याच्या शनी अमावस्येला सकाळी ९.३० वा. अभिषेक व उपस्थितांना डॉ. किशोर राजकुमार



बडजाते, चक्रेश्वरी ग्रुप, पैठण व सुमीत सुभाष गंगवाल, पैठण यांच्या बतीने महाप्रसाद देण्यात येत असतो. तरी यात्रा महोत्सवात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे अवाहन अध्य महावीर बडजाते, महामंत्री विलास पहाडे, कोषाध्यक्ष विजय पापडीवाल, विश्वस्थ प्रमोद कासलीवाल, जयकुमार बाकलीवाल, रामचंद भुस, मनोज काला, प्रकाश कासलीवाल, कैलास पाटणी, किशोर भाकरे, सुमीत गंगवाल, डॉ संजय गंगवाल, डॉ राजेंद्र काला, स्वदेश पांडे, अभिजीत काला व सकल जैन समाज पैठण यांनी केले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल यांनी दिली.

# प्राचार्य शंकरराव अनारसे यांचे शब्दवैभव पुस्तक संस्कारशील- साहित्यिक द.सा.रसाळगुरुजी

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेचे सेवानिवृत्त प्राचार्य शंकरराव अनारसे यांनी शैक्षणिक अनुभवावर आधारित' शब्दवैभव' हे लिहिलेले पुस्तक आजच्या शिक्षण क्षेत्राला दिशादर्शक ठरणारे संस्कारशील पुस्तक असल्याचे मत संगमनेर येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक, साहित्यिक दत्तात्रय सावळेराम रसाळगुरुजी यांनी व्यक्त केले.

इंदिरानगर येथील ग्रंथा वाचनालयात आयोजित 'शब्दवैभव': एक शैक्षणिक चिंतन विषयावर परिसंवादात रसाळगुरुजी बोलत होते. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. प्राचार्य अनारसे हे ८७ वर्षाचे आहेत तर मुख्याध्यापक रसाळगुरुगी हे ८८ वर्षाचे आहेत. दोघांचे शैक्षणिक, साहित्यिक क्षेत्रातील योगदान मोठे आहे. प्राचार्य अनारसे यांचे' माळावरची माती' आणि रसाळ गुरूजी यांचे' घडता घडता' ही आत्मचरित्रे त्यांच्या जीवनसंघर्षाचे महाभारत आहे, त्यामुळेच त्यांचे साहित्यचिंतन अनुभवांचे दीपस्तंभ आहेत, असे डॉ. उपाध्ये यांनी सांगितले. रसाळगुरुजी यांनी प्राचार्य अनारसे यांच्या सहवासाच्या आठवणी विसद केल्या. ते एक ज्ञानतपस्वी व्यक्तिमत्त्व असल्याचे सांगून शब्दवैभव



हे त्यांचे पुस्तक अनुभव वैभव असल्याचे मत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. शंकरराव गागरे, डॉ. शिवाजी काळे, भारत गवळी, कवयित्री संगीता फासाटे, सौ. मंदाकिनी उपाध्ये, प्रा.सौ. पल्लवी सैंदोरे यांनी परिसंवादात भाग घेतला. प्राचार्य डॉ. शंकरराव गागरे यांनी परमपूज्य पांडुरंगशास्त्री आठवले यांच्यावर रसाळगुरुजी यांनी लिहिलेल्या कवितेचे कौतुक केले. शब्दवैभव पुस्तकाचे मौलिकत्व पटवून दिले. रसाळगुरूजी यांनी स्वाध्याय परिवाराचे कार्य संगमनेर येथे याही वयात जोमाने सुरू ठेवल्याबद्दल आनंद व्यक्त केला. अशोकराव कटारे यांनी रसाळगुरूजी यांच्या चित्रकला व लेखनकलेविषयी चा आनंद व्यक्त केला. संगीता फासाटे/ कटारे यांनी सूत्रसंचालन . केले. गणेशानंद उपाध्ये व सौ. आरती उपाध्ये यांनी नियोजन केले तर प्रा.सौ.पल्लवी नंदकुमार सैंदोरे यांनी आभार मानले.

# माजी नगरसेवक मुल्लु शिंदे यांचा कार्यकर्त्यांसह काँग्रेस पक्षात प्रवेश

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भटक्या विमुक्त सेलचे जिल्हाध्यक्ष व श्रीरामपूर नगर परिषदेचे माजी नगरसेवक मल्लू मारुती शिंदे यांनी तालुक्याचे आमदार लहू कानडे यांच्या उपस्थितीत असंख्य कार्यकर्त्यांसह काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

लोकसभा निवडणूकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या प्रचारानिमित्त यशोधन कार्यालयात काल (दि.०२ मे रोजी ) बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते. यावेळी मल्लू शिंदे यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह काँग्रेस पक्षात प्रवेश केला. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अरुण पाटील नाईक यांच्या हस्ते श्री. शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात येऊन त्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत करण्यात आले.

यावेळी आ. कानडे यांच्यासह काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सचिन गुजर, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर (माऊली) मुरकुटे, माजी नगरसेवक सर्वश्री हाजी अंजुमभाई शेख, राजेश अलघ, मुक्तार शहा, सलीम शेख, मोहम्मद शेख, कलीम कुरेशी, विजय शेळके, अशोक (नाना) कानडे तसेच नानासाहेब रेवाळे, रज्जाक पठाण, दीपक कदम आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना मल्लू शिंदे म्हणाले,आ. कानडे व आपली जुनी मैत्री आहे. आम्ही पूर्वीपासून पुरोगामी विचाराच्या चळवळीत काम करीत आहोत. फुले-शाहू- आंबेडकर यांचा विचार सामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम करीत आहोत. भारतीय जनता



पक्ष हा जातीयवादी पक्ष असून जनतेला फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारापासून दूर नेऊन डॉ. आंबेडकर यांचे संविधान मोडीत काढण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा पक्षासोबत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाने युती करून लोकसभा निवडणुकीत सहभाग घेतला आहे. ते आपल्याला मान्य नाही. आ. कानडे यांनी श्रीरामपूर-राहुरी मतदार संघात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहेत. त्यांच्या विकास.कामाने प्रभावीत होऊन जातीयवादी पक्षासोबत न जाता आपण काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. जातीयवादी पक्षाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी काँग्रेसशिवाय पर्याय नाही. त्यामुळे या निवडणुकीत भाऊसाहेब वाकचौरे यांच्या विजयासाठी कार्यकर्त्यांनी तन-मन-धनाने काम करावे असेही ते म्हणाले.आ. कानडे म्हणाले, सन ८० च्या काळात लक्ष्मण माने व आपण भटक्या विमुक्त जाती जमातीतील लोकांचे जीवन समजून घेत असताना श्री. शिंदे व आपली ओळख झाली. त्यांच्या घरी आम्ही मुक्काम केला. तेव्हापासून आमची मैत्री आहे. मधल्या काळात ते काँग्रेस पासून दूर होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .